Total No. of Questions—4] [Total No. of Printed Pages—1

**[3602]-1**

**M.A. (Part I) (Term-End) EXAMINATION, 2009**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्रमांक-1**

**साहित्यप्रकाराचा अभ्यास (कादंबरी)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 60**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** साहित्यप्रकाराच्या संकल्पनेतील संकेतव्यूह विशद करा.

**किंवा**

साहित्याच्या वर्गीकरणाची आवश्यकता व महत्व स्पष्ट करा.

**2.** कादंबरीच्या विविध घटकांची चर्चा करा.

**किंवा**

साहित्याचे ठळक प्रकार कोणते, ते सांगून त्यांची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

**3.** मराठी कादंबरीतील स्त्रीजीवनाच्या समस्यांचे साधार विवेचन करा.

**किंवा**

आशयानुसार कादंबरीचे कोणते प्रकार सम्भवतात ? चर्चा करा.

**4.** कोणत्याही **दोहोंवर** टीपा लिहा :

(अ) कादंबरीतील संवादलेखन;

(ब) साहित्याच्या वर्गीकरणाची उपयुक्तता;

(क) कादंबरीतील प्रयोगशीलता;

(ड) कादंबरीतील पात्रचित्रण.

Total No. of Questions—5] [Total No. of Printed Pages—4

**[3602]-101**

**M.A. (Part I) (First Semester) EXAMINATION, 2009**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्रमांक-1**

**व्यावहारिक व उपयोजित मराठी भाग-1**

**(JUNE 2008 PATTERN)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

(*iii*) **सर्व** उपप्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** (अ) शुद्धलेखनाची संकल्पना स्पष्ट करून शुद्धलेखनाची आवश्यकता स्पष्ट करा.

**किंवा**

खालील उतारा लेखनविषयक नियमांनुसार दुरूस्त करून लिहा :

साहित्याच्या भाषेचा वेगळेपना हा शब्दाच्या निवडीमधी असतो. परंतू साहित्यामध्ये योजले जाणाऱ्या शब्दांचा गट व व्यवहारिक भाषेमध्ये येणाऱ्या शब्दांचा वेगळा गट असे वर्गिकरण नसते, हे मत आज सर्वमान्य आहे. पण असा वेगळा गट असावा असू शकतो काय याचा विचार फार पुरातन काळापासुन साहित्यशास्त्रामध्ये केला गेलेला आहे. काही साहीत्यकारांच्या मते साहित्याची स्वताची खास अशी शब्दकळा असते. व्यवहारिक भाषेतील व्यवहारीक तपशिल पुरविणारे, व्यवहारात

P.T.O.

वापरून वापरून भावाभिव्यक्ती गमावलेले असे अनेक शब्द साहित्याच्या भाषेत येत नाहीत. अपरीचित शब्द, आशयानुकुल अलंकरने व रोखठोक व्यवहारार्थ नसलेले नवे शब्द यांच्या उपयोजनेने साहित्याची भाषा ही व्यवहाराच्या भाषेपेक्षा आपले आसलेले वेगळेपण जपण्याचा प्रयत्न करीत असते. अर्थातच तत्त्वत: हे मान्य केले तरी यामधून काव्यात्म शब्दकळेचे व काव्यात्म विषयाचे जे संकेत रूढ होऊ लागतात ते मान्य होण्यासारखे नाही.

(ब) मुद्रित शोधन म्हणजे काय ते थोडक्यात सांगून मुद्रित शोधनाचे महत्त्व स्पष्ट करा.

**किंवा**

खालील उतारा आपल्या उत्तरपत्रिकेत जसाच्या तसा लिहून, त्याचे खुणांच्या साहाय्याने मुद्रित शोधन करा :

**उतारा**—'कळेसाठी कला असल्यामूळे कलावंताने आपली
निर्मीती ही कलेच्या दृष्टीने सर्वश्रेष्ठ आहे ! येव-
ढेच पाहावयाचे असते व आपल्या कलाक्रतीचा
समाजावर काय परि णाम होइल हे पाहण्याची
ताला मूळीच गरज नाही.' ही एकांगी कप्लना
सुदैवाने मागे पडली असून वाड:मय ही सामाजिक
कल्पनाअसल्यामुळे वाङ्मयाचा व समाजाचा आविभाज्य
संबंध आहे व वाङ्मयाचा समाजावर होत आसले-
ला परिणाम ही सर्वप्रथम विचारात घेण्यासारखी
गोष्ट आहे. हे तत्त्व आता सवमान्य झालेले आहे.

2. (अ) अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचे स्वरूप थोडक्यात विशद करा.

**किंवा**

वाङ्मयीन नियतकालिकांचे वाङ्मयविकासातील योगदान स्पष्ट करा.

(ब) महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवानिमित्त प्रसिद्ध करावयाच्या स्मरणिकेचा आकृतिबंध तयार करा.

**किंवा**

पुस्तक प्रकाशनाच्या प्रक्रियेतील टप्पे उलगडून दाखवा.

3. (अ) मुलाखतीचे प्रयोजन स्पष्ट करा.

**किंवा**

महाराष्ट्र शासनाचा 'आदर्श शिक्षक पुरस्कार' मिळालेल्या शिक्षकाची वर्तमानपत्रासाठी मुलाखत घ्या.

(ब) मुलाखतीचे स्वरूप माध्यमानुसार कसे बदलते ते थोडक्यात सांगा.

**किंवा**

मुलाखत घेण्यापूर्वी मुलाखतकाराने कोणती पूर्वतयारी करणे आवश्यक आहे ते विशद करा.

4. (अ) 'म. फुले महाविद्यालय, धरणगाव' या महाविद्यालयात मराठीच्या अधिव्याख्यात्याचे पद भरावयाचे आहे. या पदाची जाहिरात दि. २५ जुलै २००८ रोजी दै. सायंवेळ मध्ये आली आहे. या पदासाठी अर्जलेखन करा.

**किंवा**

वाचनालयासाठी 'कादंबरी' या वाङ्मयप्रकारातील पुस्तके मागवावयाची आहेत. त्यासाठी विविध प्रकाशकांना पाठवावयाच्या पत्राचा नमुना तयार करा.

(ब) पत्र लेखनाचे विविध प्रकार कोणते ते सांगा.

**किंवा**

गाणगापूर ते पुणे ह्या रातराणी गाडीला, मौजे सुपारी येथे 'थांबा' मिळावा, या मागणीसाठी मा. आगारप्रमुख, पुणे आगार यांना विनंती पत्र लिहा.

**5.** खालीलपैकी कोणत्याही **दोहोंवर** टीपा लिहा :

(1) साहित्य अकादमी

(2) महाराष्ट्र साहित्य पत्रिका

(3) अर्जाचे प्रकार

(4) प्रशासनिक परिभाषा.

Total No. of Questions—5] [Total No. of Printed Pages—2

**[3602]-102**

**M.A. (Part I) (First Semester) EXAMINATION, 2009**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका पत्रिका क्रमांक-2**

**अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (1818 ते 1920)**

**(JUNE 2008 PATTERN)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** 1818 ते 1860 या काळखंडातील विविध वाङ्मयीन घडामोडींचा आढावा घ्या.

**किंवा**

1818 ते 1860 या काळातील विविध वाङ्मयीन प्रेरणा स्पष्ट करा.

**2.** राष्ट्रवाद किंवा सुधारणावाद या दोन्ही प्रेरणा 1874 ते 1920 या कालखंडातील मराठी निबंधात कशा रितीने प्रकट झाल्या आहेत. ते विशद करा.

**किंवा**

1880 ते 1920 या काळातील कथा वाङ्मयाचा परिचय करून द्या.

3. बालकवी, बी, ना.वा. टिळक यांच्या कवितेची वैशिष्ट्ये साधार लिहा.

**किंवा**

गो. ब. देवल, भा.वि. वरेरकर यांच्या नाट्यविषयक कामगिरीचा आढावा घ्या.

P.T.O.

**4.** मराठी कादंबरीच्या प्रारंभिक अवस्थेत अद्भुतरम्यता, मनोरंजनात्मकता या प्रेरणा कशा कार्यरत होत्या ते स्पष्ट करा.

**किंवा**

'म. ज्योतीबा फुले यांचे वाङ्मय त्यांच्या सामाजिक कार्यतूनच निर्माण झाले होते.' या विधानाची चर्चा करा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) दर्पणकार—बाळशास्त्री जांभेकर

(2) संगीत शारदा—गो.ब.देवल.

(3) आगरकरांचा सुधारणावाद

(4) वा. म. जोशी यांच्या कादंबरी लेखनाची वैशिष्ट्ये.

Total No. of Questions—5] [Total No. of Printed Pages—2

**[3602]-103**

**M.A. (Part I) (First Semester) EXAMINATION, 2009**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्रमांक-3**

**भाषाविज्ञान : वर्णनात्मक आणि सामाजिक**

**(JUNE 2008 PATTERN)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** ''दळणवळणाचे कार्य हे भाषेतर माध्यमांनीही करता येते, परंतु मर्यादित प्रमाणात.'' या विधानाची चर्चा करा.

**किंवा**

भाषा आणि भाषण यांच्यातील भेद स्पष्ट करा.

**2.** भाषेच्या अभ्यासास इतर शास्त्रांची कशी मदत होते ते ससंदर्भ स्पष्ट करा.

**किंवा**

भाषाशास्त्र आणि समाजशास्त्र यांच्या परस्परसंबंधांची चर्चा करा.

**3.** स्वनिमसंकल्पना स्पष्ट करून स्वनिमविश्लेषणाची तत्त्वे कोणती ते लिहा.

**किंवा**

स्वनिमांचे प्रकार सांगून मराठीची स्वनिम व्यवस्था स्पष्ट करा.

P.T.O.

4. आशयबोधक रूपिम व कार्यकर रूपिम या संकल्पना स्पष्ट करा.

**किंवा**

प्रथमोपस्थित संघटक म्हणजे काय ते सांगून प्रथमोपस्थित संघटक मिळवताना कोणती दक्षता घ्यावी ते लिहा.

5. कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(*i*) अर्थाच्या व्याख्या;

(*ii*) अभ्यस्त शब्द;

(*iii*) उच्चारण व लेखन यातील भेद;

(*iv*) वाक्याचे प्रकार.

Total No. of Questions—**5+5+5+5+5**] [Total No. of Printed Pages—**8+2**

# [3602]-104

## M.A. (Part I) (First Semester) EXAMINATION, 2009

## MARATHI (मराठी)

### अभ्यासपत्रिका क्रमांक-4 (ऐच्छिक)

### (JUNE 2008 PATTERN)

**विशेष सूचना**—खालील **पाच** अभ्यासपत्रिकांपैकी कोणतीही **एक** प्रश्नपत्रिका सोडवावी.

(1) ग्रामीण साहित्य

**किंवा**

(2) मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी (प्रारंभ ते 1818)

**किंवा**

(3) तौलनिक साहित्याभ्यास

**किंवा**

(4) वाङ्मयेतिहासलेखनविद्या

**किंवा**

(5) अलंकार व छंद.

### (1) ग्रामीण साहित्य

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :**— (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा व प्रवृत्ती स्पष्ट करा.

**किंवा**

बदलत्या गावगाड्याचे दर्शन ग्रामीण साहित्यातून कसे घडते, ते सांगा.

P.T.O.

**2.** ग्रामीण साहित्य व प्रादेशिक साहित्य यातील साम्य-भेद साधार स्पष्ट करा.

**किंवा**

ग्रामीण साहित्याचे स्वरूप आणि व्याप्ती स्पष्ट करा.

**3.** ग्रामीण कादंबरीच्या आधारे ग्रामीण जीवनाच्या विविध अंगांचा वेध घ्या.

**किंवा**

शंकर पाटील आणि द.मा. मिरासदार या ग्रामीण कथाकारांच्या लेखनाचा परामर्श घ्या.

**4.** ग्रामीण कवितेच्या आधारे ग्रामीण जीवनाच्या सामाजिकतेचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

रणजित देसाई यांच्या ग्रामीण कांदबऱ्यांची वैशिष्ट्ये सोदाहरण सांगा.

**5.** खालीलपैकी **दोहोंवर** टीपा लिहा :

(1) ग्रामीण नाटके

(2) आनंद यादव यांची कविता

(3) चारुता सागर यांची कथा

(4) 'बारोमास'—सदानंद देशमुख.

**(2) मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी (प्रारंभ ते 1818)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** संस्कृती म्हणजे काय ते स्पष्ट करून तिचा साहित्यनिर्मितीशी असलेला अनुबंध स्पष्ट करा.

**किंवा**

मध्ययुगीन मराठी साहित्याचे संस्कृत आधार स्पष्ट करा.

**2.** विविध आध्यात्मिक विचारप्रवाहांमुळे मराठी संस्कृती व साहित्य यावर झालेल्या परिणामांचा परामर्श घ्या.

**किंवा**

एखादा संप्रदाय समकालीन साहित्याला कसा प्रभावित करतो त्याचे विवेचन करा.

**3.** यादवकालीन साहित्य निर्मिती-मागील सांस्कृतिक प्रेरणा विशद करा.

**किंवा**

'तुका झालासे कळस' या उक्तीचे मर्म स्पष्ट करा.

**4.** साहित्य प्रसाराची मध्ययुगीन माध्यमे कोणती ? मराठी साहित्याच्या व मराठी समाजाच्या अभिरुचीच्या जडणघडणीत त्यांचे कार्य सांगा.

**किंवा**

लोकसाहित्याचा मध्ययुगीन मराठी साहित्यावरील प्रभाव स्पष्ट करा.

5. कोणत्याही **दोहोंवर** टिपा लिहा :

(अ) 'महाराष्ट्र' नामविषयक विविध उपपत्ती

(ब) शाहिरी काव्य

(क) लोकसंस्कृतीचे उपासक

(ड) मराठी समाज आणि मनाचे श्लोक.

## (3) तौलनिक साहित्याभ्यास

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. तौलनिक साहित्याभ्यासाची आवश्यकता विशद करा.

**किंवा**

'तुलने'चे विचार प्रक्रियेतील महत्व स्पष्ट करा.

2. 'प्रभावा'चे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

'राष्ट्रीय साहित्या'ची संकल्पना स्पष्ट करा.

3. प्रभाव व प्रभव या संकल्पनांतील भेद स्पष्ट करा.

**किंवा**

विश्व साहित्याची संकल्पना तौलनिक साहित्याभ्यासासाठी कशी उपयोगी पडते ते लिहा.

4. काझी सलीम व मर्ढेकर यांच्या काव्यावरील सामाजिकतेचा परिणाम स्पष्ट करा.

**किंवा**

काझी सालीम व मर्ढेकर यांच्या काव्याची तुलना करण्यासाठी कोणत्या प्रकारे घटक निश्चिती करता येईल, त्याची चर्चा करा.

**5.** खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) सहजसाधर्म्य (Analogy)

(2) तौलनिक साहित्याच्या मर्यादा

(3) मर्ढेकर व काझी सलीम यांच्या काव्यातील समानता

(4) मर्ढेकर व काझी सलीम यांच्या काव्यातील आवाहनात्मकता.

## (4) वाङ्मयेतिहासलेखनविद्या

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. 'इतिहास' संकल्पनेच्या वेगवेगळ्या व्याख्या सांगून ऐतिहासिक स्थित्यंतरांचे स्वरूप विशद करा.

**किंवा**

वाङ्मयेतिहास व अन्य प्रकारचे इतिहास यातील साम्यभेदांची चर्चा करा.

2. वाङ्मयेतिहास म्हणजे काय ते थोडक्यात सांगून वाङ्मयेतिहास व टीकाशास्त्र यांचा संबंध स्पष्ट करा.

**किंवा**

वाङ्मयेतिहासातील संशोधनाचे महत्व विशद करा.

3. वाङ्मयेतिहास संकल्पनेविषयीच्या विचारांचा परामर्श घ्या.

**किंवा**

वाङ्मयेतिहासकारांसमोरील उद्दिष्टांनुसार वाङ्मयेतिहासाचे कोणते प्रकार संभवतात ते लिहा.

4. वाङ्मयेतिहास विचारातील नवसंकल्पना कोणत्या ते थोडक्यात स्पष्ट करा.

**किंवा**

वाङ्मयेतिहासलेखनासाठी कोणकोणत्या प्रकारची सामग्री आवश्यक असते ते लिहा.

5. खालीलपैकी कोणत्याही **दोहोंवर** टीपा लिहा :

(1) इतिहास लेखनासंबंधीच्या उपपत्ती

(2) वाङ्मयाचा भूगोल

(3) बृहद्वाङ्मयेतिहास

(4) कालपट.

## (5) अलंकार व छंद

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** 'अलंकार' या संज्ञेची संस्कृतातील पूर्वपीठिका सांगून भरत आणि वामन यांच्या मतांचा उहापोह करा.

**किंवा**

अलंकारांचे अलंकारत्व सिद्ध होण्यासाठी आवश्यक असलेल्या विविध तत्त्वांचा सविस्तर परिचय करून द्या.

**2.** ''मराठी मधील प्रारंभीची पद्यरचना बहुतांशी अभंग आणि ओवी या छंदातील आहे.'' सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

प्राचीन छंदाचे स्वरूप व प्रकार विशद करा.

**3.** काव्यगुण म्हणजे काय ते सांगून गुण आणि अलंकार यांच्यामधील अन्योन्य संबंधाविषयी व्यक्त झालेल्या विविध मतांची माहिती द्या.

**किंवा**

'अलंकार हे काव्यशरीरबाह्य नसून शरीरांगभूत असतात.' सोदाहरण स्पष्ट करा.

4. छंद, जाति आणि वृत्त या पद्यरचनेच्या **तीन** प्रकारांचे स्वरूप व वैशिष्ट्ये विशद करा.

**किंवा**

अविषय, निपात, श्रेय:संधी, विपर्यय या नव्या अलंकारांचे सोदाहरण विवेचन करा.

5. कोणत्याही **दोहों**वर टिपा लिहा :

(1) प्रतिमा आणि अलंकार

(2) डॉ. माधवराव पटवर्धन यांचे छंदशास्त्रीय कार्य

(3) मुक्तछंद

(4) अलंकार व काव्यविभ्रम.

Total No. of Questions—4] [Total No. of Printed Pages—2

**[3602]-2**

**M.A. (Part I) (Term-End) EXAMINATION, 2009**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्रमांक-2**

**अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (इ. स. 1818 ते 1960)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 60**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** अव्वल इंग्रजी राजवटीतील सामाजिक, सांस्कृतिक जीवनाचा वाङ्मयावर झालेला परिणाम विशद करा.

**किंवा**

एकोणिसाव्या शतकातील निबंधवाङ्मयात मांडल्या गेलेल्या विचारांचा परामर्श घ्या.

**2.** 1880 ते 1920 या काळात कादंबरी वाङ्मयात कोणकोणती स्थित्यंतरे झाली ते सविस्तर लिहा.

**किंवा**

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील कथावाङ्मयाच्या स्वरूपाची ओळख करून द्या.

**3.** केशवसुत संप्रदायातील कवींच्या काव्यलेखनाचा परामर्श घ्या.

**किंवा**

1818 ते 1920 या काळात निर्माण झालेल्या नाट्यवाङ्मयाचा आढावा घ्या.

P.T.O.

**4.** कोणत्याही **दोहोंवर** टीपा लिहा :

(अ) निबंधमाला;

(ब) शेतकऱ्याचा आसूड;

(क) 'काळ' वर्तमानपत्राची भाषाशैली;

(ड) खाडिलकरांचे 'कीचकवध' नाटक.

Total No. of Questions—4] [Total No. of Printed Pages—2

**[3602]-3**

**M.A. (Part I) (Term-End) EXAMINATION, 2009**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्रमांक-3**

**भाषाविज्ञान : वर्णनात्मक आणि सामाजिक**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 60**

**सूचना** :— (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** "इतर माध्यमांपेक्षा भाषा हे दळणवळणाचे प्रभावी माध्यम आहे." या विधानाची सोदाहरण चर्चा करा.

**किंवा**

भाषेचे स्वरूप स्पष्ट करून भाषेची कार्ये कोणती ते सांगा.

**2.** वाक्यविन्यास संकल्पना स्पष्ट करून वाक्याचे पृथक्करण करा.

**किंवा**

भाषाभ्यासाच्या विविध कक्षा सांगून समाजभाषाविज्ञानाचे स्वरूप स्पष्ट करा.

**3.** स्वनिम संकल्पनेचे स्वरूप विशद करून स्वनिमनिश्चिती कोणत्या तत्त्वांनुसार केली जाते, ते लिहा.

**किंवा**

रूपिका-रूपिम-रूपिकांतर या संकल्पना स्पष्ट करून त्यांच्या परस्परसंबंधाची चर्चा करा.

4. कोणत्याही **दोहोंवर** टीपा लिहा :

(*i*) बोली भूगोल

(*ii*) मराठीतील व्यंजनस्वनिम

(*iii*) प्रथमोपस्थित संघटक पद्धती

(*iv*) शैलीगत अर्थ.

Total No. of Questions—**4+4+4+4+4**] [Total No. of Printed Pages—**4+2**

**[3602]-4**

## M.A. (Part I) (Term-End) EXAMINATION, 2009

## MARATHI (मराठी)

### अभ्यासपत्रिका क्रमांक-4 (ऐच्छिक)

**विशेष सूचना :—** खालील **पाच** अभ्यासपत्रिकांपैकी कोणतीही **एक** प्रश्नपत्रिका सोडवावी.

(1) ग्रामीण साहित्य आणि दलित साहित्य

**किंवा**

(2) मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी (प्रारंभ ते 1960)

**किंवा**

(3) तौलनिक साहित्याभ्यास व भाषांतर मीमांसा

**किंवा**

(4) वाङ्मयेतिहासलेखनविद्या

**किंवा**

(5) अलंकार, छंद आणि व्याकरण

### (1) ग्रामीण साहित्य आणि दलित साहित्य

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 60**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** ग्रामीण साहित्याच्या वैशिष्ट्यांची सांगोपांग चर्चा करा.

**किंवा**

ग्रामीण साहित्य निर्मितीमागील सामाजिक प्रेरणांचा उहापोह करा.

P.T.O.

2. स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील ग्रामीण कादंबरीच्या विकासातील महत्त्वाचे टप्पे विशद करा.

**किंवा**

स्वातंत्र्योत्तर कालखंडात ग्रामीण कथेचा विकास कसा होत गेला त्याची चर्चा करा.

3. ग्रामीण कवितेच्या आधारे ग्रामीण जीवनाच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचे स्वरूप विशद करा.

**किंवा**

व्यंकटेश माडगूळकर यांच्या लेखनकर्तृत्वाचा परिचय करून द्या.

4. खालीलपैकी **दोहोंवर** टीपा लिहा :

(*i*) ग्रामीण कवितेतील कृषीदर्शन;

(*ii*) 'गारंबीचा बापू'—श्री ना. पेंडसे;

(*iii*) बहिणाबाई चौधरी;

(*iv*) ग्रामीण साहित्याचे प्रकार.

## (2) मराठी वाङ्‌मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी (प्रारंभ ते 1960)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 60**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** "साहित्य आणि संस्कृती यांच्या संदर्भ चौकटीचे सम्यक भान साहित्याच्या आकलनासाठी आवश्यक आहे." साधार स्पष्ट करा.

**किंवा**

वैदिक आणि अवैदिक विचारधारांतून मराठी संस्कृती व साहित्याने कोणते विशेष आत्मसात केले ? चर्चा करा.

**2.** "वाङ्‌मयात सामाजिक व धार्मिक जीवनाचा आविष्कार पहावयास मिळतो." साधार स्पष्ट करा.

**किंवा**

छत्रपती शिवाजी महाराज आणि साधूसंत यांच्या कार्यापासून मराठी वाङ्‌मयाने कोणती प्रेरणा घेतली ते स्पष्ट करा.

**3.** 'लोकगीते, लोककथा, लोकनाट्य इ. लोकसाहित्य हेच मूळ मराठी साहित्य होय', उहापोह करा.

**किंवा**

साहित्य प्रसाराच्या मध्ययुगीन माध्यमांची स्वरूप व महत्त्व विशद करा.

**4.** कोणत्याही **दोहों**वर टिपा लिहा :

(अ) 'महाराष्ट्र' नामविषयक विविध उपपत्ती;

(ब) महानुभावांचा आचारधर्म;

(क) गुरुचरित्र;

(ड) शाहिरी काव्य.

## (3) तौलनिक साहित्याभ्यास व भाषांतर मीमांसा

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 60**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. तौलनिक साहित्याभ्यास पद्धती साहित्याच्या आकलनासाठी व मूल्यमापनासाठी कशी उपयोगी ठरते ते लिहा.

**किंवा**

वाङ्मयीन प्रभावाची विविध कारणे कोणती ते स्पष्ट करा.

2. 'विश्वसाहित्य' संकल्पनेची उपयुक्तता विशद करा.

**किंवा**

राष्ट्रीय साहित्याच्या निकषांची चर्चा करून भारतीय संदर्भात 'राष्ट्रीय साहित्य' ही संकल्पना स्पष्ट करा.

3. भाषांतराचे महत्त्व स्पष्ट करून भाषांतराचे प्रकार सांगा.

**किंवा**

भाषांतर, अनुवाद व रूपांतर या प्रक्रियांमधील साम्यभेद स्पष्ट करा.

4. खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) लक्ष्यनिष्ठ भाषांतर;

(ब) अनुवादातील अडचणी;

(क) तुलना प्रक्रियेचे स्वरूप;

(ड) कवितेचे भाषांतर.

(4) **वाङ्‌मयेतिहासलेखनविद्या**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 60**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** इतिहासलेखनासंबंधीच्या विविध उपपत्तींचा परामर्श घ्या.

**किंवा**

इतिहासातील ऐतिहासिक स्थित्यंतरांचे स्वरूप स्पष्ट करून त्याचा वाङ्‌मयावर होणारा परिणाम विशद करा.

**2.** वाङ्‌मयेतिहास म्हणजे काय, ते सांगून वाङ्‌मयेतिहास लेखनात संशोधनाचे कसे साहाय्य होते ते स्पष्ट करा.

**किंवा**

वाङ्‌मयेतिहास संकल्पनेबाबतचा भारतीय विचारव्यूह कोणता, ते सविस्तर लिहा.

**3.** वाङ्‌मयेतिहास लेखनाचे उद्दिष्टांनुसार पडणारे प्रकार कोणते, ते लिहा.

**किंवा**

वाङ्‌मयेतिहासलेखनासाठी वाङ्‌मयेतिहासकाराजवळ कोणती सामग्री आवश्यक असते, ते लिहा.

**4.** कोणत्याही **दोहोंवर** टीपा लिहा :

(अ) वाङ्‌मयेतिहासलेखनाची ध्येये व उद्दिष्टे;

(ब) वाङ्‌मयेतिहासाची आवश्यकता;

(क) वाङ्‌मयेतिहासाचे पुनर्लेखन;

(ड) वाङ्‌मयाचा भूगोल.

## (5) अलंकार, छंद आणि व्याकरण

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 60**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** अलंकारांच्या विविध व्याख्या सांगून संस्कृत मीमांसकांच्या अलंकारविषयक विचारांचा आढावा घ्या.

**किंवा**

रुय्यकाची अलंकाराच्या वर्गीकरणामागील तत्त्वे विशद करा.

**2.** 'छन्दोज्ञान काव्यप्रेरक नारी पण काव्यशोधक आहे.' या माधवराव पटवर्धनांच्या विधानाची चर्चा करा.

**किंवा**

छांदस रचनेतून भावप्रकटीकरण कसे होते ते लिहा.

**3.** अलंकार संकर आणि अलंकार संसृष्टी यातील भेद साधार स्पष्ट करा.

**किंवा**

चित्रालंकार, आवर्तन, भाषामिश्र, विपर्यय या नव्या अलंकारांचे विवेचन करा.

**4.** कोणत्याही **दोहों**वर टिपा लिहा :

(अ) अलंकार व वक्रोक्ती;

(ब) छंदोरचनेतील लयतत्त्व;

(क) अलंकारांच्या वर्गीकरणाची तत्त्वे;

(ड) वि. का. राजवाडे यांनी मराठी छंदांचा केलेला विचार.

Total No. of Questions—4]

[Total No. of Printed Pages—1

**[3602]-5**

# M.A. (Part II) (Term-End) EXAMINATION, 2009

## MARATHI (मराठी)

### अभ्यासपत्रिका क्रमांक 5

### (साहित्य सिद्धांत आणि समीक्षा)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 60**

**सूचना :**— (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** साहित्य म्हणजे काय ? साहित्याचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

तेन आणि मार्क्स यांच्या भूमिकांच्या आधारे साहित्याची समाजसंबद्धता स्पष्ट करा.

**2.** 'लेखक लिहितो ते स्वत:साठी की इतरांसाठी', चर्चा करा.

**किंवा**

साहित्यनिर्मितीसंबंधीचे क्रीडाप्रवृत्ती सिद्धांत व उर्वरीत शक्तिसिद्धान्त स्पष्ट करा.

**3.** साहित्याच्या भाषेची अनेकार्थता, विरोधाभासात्मकता व पदसंदर्भता स्पष्ट करा.

**किंवा**

साहित्यनिर्मितीत कल्पनाशक्ती व चमत्कृती यांचे कार्य कसे चालते ते सोदाहरण लिहा.

**4.** कोणत्याही **दोहोंवर** टीपा लिहा :

(अ) ॲरिस्टॉटलची 'सत्य' संकल्पना

(ब) मराठीतील अस्तित्ववादी लेखन

(क) अनुभव आणि त्याचा आविष्कार

(ड) साहित्याच्या स्वरूपासंबंधीचा लौकिकतावादी दृष्टिकोन.

Total No. of Questions—4+4] [Total No. of Printed Pages—4

**[3602]-6**

**M.A. (Part II) (Term-End) EXAMINATION, 2009**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्रमांक 6**

**(विशेष लेखकाचा अभ्यास (प्राचीन) : संत चोखामेळा**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 60**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** 'नामचि पावन नामचि पावन' या उद्‌घोषामागे चोखोबांच्या भक्तीभावनेचा प्रत्यय कसा येतो, ते लिहा.

**किंवा**

वारकरी संप्रदायाचे आचरण व नीती यांचे प्रकटन चोखामेळा यांच्या विठ्ठलमहिमापर व पंढरीमहिमापर अभंगांतून कसे घडते, ते सविस्तर लिहा.

**2.** चोखोबांच्या विठ्ठलमहिमापर अभंगांतून विठ्ठलाचे प्रातिभासिक रूप कसे निर्माण झाले आहे, ते साधार लिहा.

**किंवा**

'व्यापक व्यापला तिन्ही त्रिभुवनी चारी वर्ण वाणी विठू माझा' या आशयसूत्राचे विठ्ठलमहिमापर अभंगांच्या आधारे विवरण करा.

**3.** संत चोखामेळा यांच्या अभंगांतून वारकरी शैलीचा प्रत्यय कसा येतो, ते सविस्तर लिहा.

P.T.O.

**किंवा**

संत चोखामेळा यांच्या नामपर, पंढरीमहिमापर, विठ्ठलमहिमापर अभंगांतून समकालिनतेचे पडसाद कसे उमटले आहेत, ते लिहा.

4. कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) चोखामेळा यांच्या अभंगांतील भक्तवत्सल पांडुरंगाची प्रतिमा

(ब) विठ्ठलनाम : 'अवघ्या धर्माचे हे सार'

(क) चोखामेळा : श्रेष्ठ श्रद्धावंत

(ड) चोखामेळा यांच्या अभंगवाणीची अर्थसुगमता.

**(विशेष लेखकाचा अभ्यास (अर्वाचीन) : रा. रं. बोराडे**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 60**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** ग्रामीण मनाला आत्मभान देण्याचे कार्य रा. रं. बोराडे यांच्या कथांमधून कसे घडले आहे, ते साधार लिहा.

**किंवा**

स्त्री-जीवनविषयक कारुण्यदृष्टी रा. रं. बोराडे यांच्या कथांमधून कशी व्यक्त होते, ते विशद करा.

**2.** रा. रं. बोराडे यांचे लौकिक जीवन आणि त्यांचे ग्रामीण कथालेखन यांमधील अनुबंध स्पष्ट करा.

**किंवा**

रा. रं. बोराडे यांच्या कथा ग्रामीण जीवनातील ताणतणाव कशा अभिव्यक्त करतात, ते सविस्तर लिहा.

**3.** 'रा. रं. बोराडे यांच्या कथा शेती आणि माणूस यांचे जागरूक भान ठेवतात'—या विधानाची चर्चा करा

**किंवा**

ग्रामीण कथालेखनात रा. रं. बोराडे यांचे ग्रामीण कथाकार म्हणून स्थान निश्चित करा.

4. कोणत्याही **दोहोंवर** टीपा लिहा :

(अ) रा. रं. बोराडे यांच्या कथांमधील ग्रामीण बालमनाचे दर्शन.

(ब) रा. रं. बोराडे यांच्या कथांमधील वातावरण निर्मिती.

(क) रा. रं. बोराडे यांच्या कथांमधील विनोद.

(ड) रा. रं. बोराडे यांच्या कथांची भाषिक वैशिष्ट्ये.

Total No. of Questions—4]  [Total No. of Printed Pages—2

**[3602]-7**

**M.A. (Part II) (Term-End) EXAMINATION, 2009**

**MARATHI (मराठी)**

**विशेषस्तर : अभ्यासपत्रिका क्रमांक-7**

**विशिष्ट वाङ्‌मयीन कालखंडाचा अभ्यास—शिवकाल**

**वेळ : तीन तास**  **एकूण गुण : 60**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** 'वाङ्‌मयीन कालखंड' ही संकल्पना सविस्तर स्पष्ट करा.

**किंवा**

वाङ्‌मयेतिहास लेखनाच्या दृष्टीने 'वाङ्‌मयीन कालखंड' कसे सिद्ध करता येतील ? ते सोदाहरण लिहा.

**2.** 'एकाच वाङ्‌मयीन कालखंडात वेगवेगळे वाङ्‌मयीन प्रवाह अस्तित्वात असतात'—हे विधान स्पष्ट करा.

**किंवा**

शिवकालीन वाङ्‌मयात तत्कालीन समाजजीवन-राजकारण व धर्मकारणाचे पडसाद कसे उमटतात ? ते सविस्तर लिहा.

**3.** शिवकालाच्या संदर्भात संत रामदास यांचे वाङ्‌मयीन कर्तृत्व विशद करा.

**किंवा**

शिवकालीन बखर-वाङ्‌मयाच्या प्रेरणा व प्रवृत्तींची चिकित्सा करा.

P.T.O.

4. कोणत्याही **दोहोंवर** टीपा लिहा :

(अ) शिवकालीन धर्मसंप्रदायांची वैशिष्टे;

(ब) शिवकालीन वाङ्‌मयाचे भाषिक वेगळेपण;

(क) शिवकालीन वाङ्‌मय : अस्मिता-जागृती;

(ड) 'तुका झालासे कळस'.

Total No. of Questions—4+4+4+4+4+4] [Total No. of Printed Pages—8

**[3602]-8**

## M.A. (Part II) (Term-End) EXAMINATION, 2009

## MARATHI (मराठी)

### अभ्यासपत्रिका क्रमांक-8 (ऐच्छिक)

(1) सौंदर्यशास्त्र.

(2) लोकसाहित्याची मूलतत्वे आणि मराठी लोकसाहित्य.

(3) लेखनविद्या व निबंध लेखन.

(4) मराठीतील वैचारिक साहित्य.

(5) साहित्याचा सामाजिक दृष्टिकोनातून अभ्यास.

(6) निबंध लेखन.

**विशेष सूचना :—** ह्या प्रश्नपत्रिकांपैकी कोणतीही **एक** प्रश्नपत्रिका सोडवावी.

### (1) सौंदर्यशास्त्र

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 60**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** विज्ञान, मनोविज्ञान आणि तत्त्वज्ञान यांचा सौंदर्यशास्त्राशी कोणता संबंध आहे, ते सूत्ररूपाने मांडा.

**किंवा**

सौंदर्यविधान हे सार्वत्रिक की व्यक्तिनिष्ठ असते ? याची चिकित्सा करा.

**2.** सौंदर्यविषयक आविष्कारवादी सिद्धांतांचा सोदाहरण परिचय करून द्या.

**किंवा**

सौंदर्यानुभवातील 'वैश्विकता' ही संकल्पना स्पष्ट करा.

P.T.O.

3. निसर्गातील सौंदर्य आणि निसर्गाबाहेरील सौंदर्य यांची तुलना करून सौंदर्याची अशी विभागणी उचित वाटते काय ? साधार लिहा.

**किंवा**

बा. सी मर्ढेकर यांनी मांडलेल्या लयसिद्धांताची चिकित्सा करा.

4. कोणत्याही **दोहोंवर** टीपा लिहा :

(अ) सौंदर्यविधान आणि द्विध्रुवात्मकता

(ब) सौंदर्यविषयक क्रीडासिद्धांत

(क) सौंदर्यानुभवाचे नवेपण

(ड) सौंदर्यशास्त्राच्या अभ्यासाची आवश्यकता.

(2) **लोकसाहित्याची मूलतत्वे आणि मराठी लोकसाहित्य**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 60**

**सूचना** :— (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. लोकसाहित्य म्हणजे काय, हे स्पष्ट करून इतिहास, दैवतकथाशास्त्र यांच्याशी असलेला अनुबंध स्पष्ट करा.

**किंवा**

लोकसाहित्याच्या अध्ययनाची आवश्यकता शास्त्रे, कला आणि साहित्य यांच्या अभ्यास-संदर्भाने विशद करा.

2. लोकसाहित्याचा प्रभाव अर्वाचीन साहित्यावर कितपत जाणवतो ? सोदाहरण चर्चा करा.

**किंवा**

लोकतत्व, लोकबंध व आवर्तक कल्पनाबंध या संकल्पना स्पष्ट करा.

3. लोकसाहित्य संकलनाच्या पद्धतींचा परिचय करून द्या.

**किंवा**

लोकसाहित्यातून लोकसमूहमानसाचे दर्शन कसे घडते ते सोदाहरण लिहा.

4. कोणत्याही **दोहोंवर** टीपा लिहा :

(अ) लोकसाहित्याचे सादरीकरण

(ब) लोकसाहित्याचा आस्वाद

(क) लोकसाहित्य आणि भाषाशास्त्र

(ड) लोकसंस्कृती म्हणजे काय ?

## (3) लेखनविद्या व निबंध लेखन

### (नवा अभ्यासक्रम)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 60**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** जीवन-व्यवहारांतील संवादाचे महत्त्व, गरज व कार्य स्पष्ट करा.

**किंवा**

'लेखनविद्या' या ज्ञानक्षेत्राचा परिचय करून द्या.

**2.** अर्थ म्हणजे काय ? विविध व्याख्यांच्या आधारे स्पष्ट करा.

**किंवा**

मराठीची संवादक्षमता साधार सिद्ध करा.

**3.** संवाद म्हणजे काय ? संवादप्रक्रियेतील अडथळे निश्चित करा.

**किंवा**

विविध जीवनक्षेत्रांच्या संदर्भात संवाद-प्रक्रियेचे स्वरूप स्पष्ट करा.

**4.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) संवाद प्रक्रियेतील सर्जनशीलता

(ब) संवाद कौशल्यांची आवश्यकता

(क) संवादाची व्यक्तिगत जीवनातील गरज

(ड) संवाद प्रक्रियेचे सामर्थ्य.

**(4) मराठीतील वैचारिक साहित्य**

**(नवा अभ्यासक्रम)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 60**

**पाठ्यपुस्तके :—** (*i*) सार्वजनिक सत्यधर्म – म. फुले

(*ii*) स्त्री-पुरुष तुलना – ताराबाई शिंदे

(*iii*) वि. रा. शिंदे यांचे निवडक लेख

(*iv*) क्रांती सुक्ते – राजर्षी छत्रपती शाहू

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1:** एकोणीसाव्या शतकातील वैचारिक भूमिकांचा तुम्ही अभ्यासलेल्या वैचारिक लेखनाच्या आधारे सूत्ररूप आढावा घ्या.

**किंवा**

''म. फुले यांची विचारमांडणी वैशिष्ट्यपूर्ण आहे.'' या विधानाचा परामर्श घ्या.

**2.** ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री-पुरुष तुलना' या निबंधात कोणते तौलनिक विचार मांडले आहेत. ते स्पष्ट करा.

**किंवा**

'स्त्री-पुरुष तुलना' मधील वैचारिकतेचा कालिक संदर्भ स्पष्ट करा.

**3.** वि. रा. शिंदे यांची विचारशैली त्यांच्या निवडक लेखांच्या आधारे स्पष्ट करा.

**किंवा**

राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांतील नवता सोदाहरण विशद करा.

**4.** कोणत्याही **दोहोंवर** टीपा लिहा :

(अ) वैचारिक साहित्याची संकल्पना

(ब) शाहू महाराजांच्या विचारातील समता-मूल्य

(क) म. फुले यांच्या विचारांची आवश्यकता

(ड) वि. रा. शिंदे यांचे समाजसुधारणाविषयक विचार.

**(5) साहित्याचा सामाजिक दृष्टिकोनातून अभ्यास**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 60**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** साहित्याची सामाजिकता आणि कलामूल्ये यामधील संबंध स्पष्ट करा.

**किंवा**

कलारूपांतील स्थित्यंतरांच्या कारणांची साधार चर्चा करा.

**2.** जीवनातील परिवर्तनांचा प्रभाव साहित्याच्या रूपबंधांवर कसा होतो ? ते सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

साहित्यनिर्मिती, साहित्यप्रकाशन व साहित्यवितरण यांच्यावर वाचकांचे नियंत्रण असते काय ? साधार चर्चा करा.

**3.** साहित्यकृतिनिष्ठ विचार म्हणजे काय ? सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

'साहित्याचा परिस्थितीनिष्ठ विचार'— ही संकल्पना उलगडून दाखवा.

**4.** कोणत्याही **दोहोंवर** टीपा लिहा :

(अ) साहित्याची सामाजिकता : संकल्पना स्पष्टीकरण

(ब) लेखकाचे व्यक्तिमत्व आणि समकालीन जीवन

(क) वाचकांची अभिरुची व लोकप्रिय साहित्य

(ड) वैचारिक चळवळी आणि साहित्यनिर्मिती.

## (6) निबंध लेखन

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 60**

पुढीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर प्रदीर्घ निबंध लिहा :

(1) साहित्य आणि मनोरंजनाची आधुनिक साधने.

(2) मराठीभाषा स्थिती-गती.

(3) नाटक-कालचे आणि आजचे.

(4) तौलनिक साहित्याभ्यास.